दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | सोमवार, दि. १० ऑगस्ट २०२६ | वर्ष - १ | अंक - ३१३ | पाने - ४

पुणे/पिंपरी-चिंचवड


### आजचे पंचांग

दिनांक : १० ऑगस्ट २०२६ वार : सोमवार माह (अमावस्यांत) : आषाढ माह (पूर्णिमांत) : श्रावण ऋतु : वर्षा आयन : दक्षिणायन पक्ष : कृष्ण पक्ष तिथी : ड्दशी तिथी (सकाळी ०८:०० पर्यंत) त्यानंतर त्रयोदशी तिथी नक्षत्र : आर्द्रा नक्षत्र (दुपारी १२:२६ पर्यंत) त्यानंतर पुनर्वसू नक्षत्र योग : वज्र योग (रात्री १०:२६ पर्यंत) त्यानंतर सिद्धि योग करण : तैतुला करण (सकाळी ०८:०० पर्यंत) त्यानंतर गराजा करण

### थलपथी विजय आणि खासदारांच्या बैठकीनंतर तामिळनाडूचा मोठा निर्णय

**पुणे :** लोकसभा मतदारसंघांच्या संभाव्य फेररचनेसंदर्भात तमिळनाडूतील टीव्हीके सरकारने आपली भूमिका आता निश्चित केली आहे. महत्वाचे म्हणजे, केंद्र सरकारच्या परिसीमन धोरणाला औपचारिक विरोध दर्शवण्यासाठी तामिळनाडू सरकार आगामी विधानसभा अधिवेशनात एक विशेष प्रस्ताव पारित करणार आहे. मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय (थलपती विजय) यांनी बोलावलेल्या सर्वपक्षीय खासदारांच्या बैठकीत मतदारसंघ फेररचना विधेयकाला एकमताने विरोध करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## सारांश वृत्त

### ममता बॅनर्जींच्या ताफ्यावर चिखल, चप्पल, बूटफेक! बंगालच्या राजकारणात संतापाचा स्फोट; 'कायद्याचे राज्य कुठे?'



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता : वृत्तसंस्था**

पश्चिम बंगालच्या माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या ताफ्यावर रविवारी उत्तर २४ परगणा जिल्ह्यात झालेल्या कथित हल्ल्याने राज्यातील राजकीय वातावरण पुन्हा तापले आहे. बीजपूर येथे मृत तृणमूल काँग्रेस कार्यकर्त्याच्या कुटुंबीयांची भेट घेण्यासाठी जात असताना आंदोलकांनी त्यांच्या वाहनाला घेराव घातला. यावेळी 'चोर-चोर'च्या घोषणा देत वाहनावर चिखल, चप्पल, बूट आणि दगड फेकण्यात आल्याचा दावा ममता बॅनर्जी यांनी केला.

ममता बॅनर्जी यांनी या घटनेला कट असल्याचा आरोप करत, आपल्या दौऱ्याची पूर्वकल्पना पोलिसांना देऊनही पुरेशी सुरक्षा व्यवस्था करण्यात आली नसल्याचा गंभीर आरोप केला. पश्चिम बंगालमध्ये गुंडांचे राज्य सुरू आहे, असा हल्लाबोलही त्यांनी केला.

मात्र दुसरी बाजूही तितकीच महत्त्वाची आहे. आंदोलकांनी ममता बॅनर्जी शांतताप्रिय भागात 'शांतताभंग करण्यासाठी' आल्याचा आरोप करत जोरदार घोषणाबाजी केली. त्यामुळे प्रश्न केवळ राजकीय विरोधाचा राहिलेला नाही; राजकीय मतभेद व्यक्त करण्याची पद्धत हिंसक होऊ लागली तर लोकशाहीच्या मर्यादा नेमक्या कुठे संपतात? दरम्यान, हलीसहर पोलिसांच्या कोठडीत प्रकृती बिघडल्याने तृणमूल कार्यकर्त्याचा मृत्यू झाल्याचा आरोप आहे. याच पार्श्वभूमीवर हा विरोध झाल्याचे सांगितले जात आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष सुवेंदू अधिकारी यांनीही वाहनावर दगड, चिखल किंवा चप्पल फेकण्याच्या घटनेचे समर्थन केले नसल्याचे स्पष्ट केले असून, भाजप कार्यकर्ता सहभागी नसल्याचा दावा केला आहे. सत्ता कोणाचीही असो माजी मुख्यमंत्र्यांच्या ताफ्यावर हल्ला होत असेल, तर तो केवळ एका नेत्यावरील हल्ला राहत नाही; तो राज्यातील कायदा-सुव्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह उभे करतो.

# एन्क्रिप्शनचा किल्ला अभेद्य!

## व्हॉट्सअ‍ॅपची 'ट्रेसेबिलिटी' मोडणार का? तांत्रिक मर्यादेमुळे केंद्र सरकारच्या सोशल मीडिया नियंत्रणाला मोठा धक्का



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली : प्रतिनिधी**

सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरील संदेशांचा 'पहिला प्रेषक' शोधण्याच्या केंद्र सरकारच्या प्रयत्नांना आता तांत्रिक आणि कायदेशीर अशा दोन्ही आघाड्यांवर मोठे आव्हान उभे राहण्याची शक्यता आहे. 'पॉडचासोव्ह विरुद्ध रशिया' या प्रकरणात युरोपियन कोर्ट ऑफ ह्युमन राइट्सने (एईंक्ळ) एंड-टू-एंड एन्क्रिप्शनच्या संरक्षणाबाबत दिलेला निकाल भारतातील व्हॉट्सअ‍ॅपच्या 'ट्रेसेबिलिटी' वादाला नवा संदर्भ देणारा ठरला आहे.

प्रश्न केवळ व्हॉट्सअ‍ॅपचा नाही; तर सरकारला सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर किती नियंत्रण ठेवता येऊ शकते आणि नागरिकांच्या खासगी संवादावर राज्याची पोहोच कुठपर्यंत असावी, हा मूलभूत प्रश्न या वादाच्या केंद्रस्थानी आला आहे.

भारतामध्ये माहिती तंत्रज्ञान नियम, २०२१ मधील नियम ४(२) अंतर्गत विशिष्ट परिस्थितीत महत्त्वाच्या सोशल मीडिया मध्यस्थांना संदेशाचा 'पहिला प्रेषक' ओळखण्याची तरतूद आहे. मात्र व्हॉट्सअ‍ॅपचा दावा असा आहे की त्याची एंड-टू-एंड एन्क्रिप्शन व्यवस्था कायम ठेवून अशा प्रकारची ट्रेसेबिलिटी लागू करणे तांत्रिकदृष्ट्या अत्यंत गुंतागुंतीचे आहे. त्यासाठी प्रणालीत बदल किंवा अतिरिक्त ओळख-आधारित यंत्रणा उभी करावी लागू शकते.

याच ठिकाणी केंद्र सरकारसमोर मोठा पेच निर्माण होतो. ज्या तंत्रज्ञानाची रचना संदेशातील मजकूर स्वतः प्लॅटफॉर्मलाही वाचता येऊ नये, अशी आहे, त्या तंत्रज्ञानावर सरकारला मागच्या दाराने नियंत्रण मिळवता येईल का? आणि जर एखाद्या संदेशाचा पहिला प्रेषक शोधण्यासाठी एन्क्रिप्शनच्या मूलभूत रचनेत बदल करावा लागला, तर त्याचा परिणाम केवळ संशयित व्यक्तीवर होईल की कोट्यवधी सामान्य युजर्सच्या गोपनीयतेवरही?

'पॉडचासोव्ह विरुद्ध रशिया' प्रकरणात एईंक्ळ ने व्यापक एन्क्रिप्शन कमकुवत करणाऱ्या उपायांबाबत गोपनीयता आणि अभिव्यक्तिस्वातंत्र्याच्या दृष्टीने गंभीर चिंता व्यक्त केली. हा निकाल भारतातील न्यायालयांवर थेट बंधनकारक नसला, तरी गोपनीयता, एन्क्रिप्शन आणि राज्याच्या डिजिटल देखरेखीच्या मर्यादा यावरील चर्चेत त्याचा संदर्भ महत्त्वाचा ठरू शकतो.

भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने 'पुट्टास्वामी' निकालात गोपनीयतेला मूलभूत अधिकाराचा दर्जा दिला आहे. त्यामुळे राष्ट्रीय सुरक्षा, गुन्हेगारी तपास आणि नागरिकांची डिजिटल गोपनीयता यांच्यात संतुलन साधण्याचे आव्हान अधिक गंभीर बनले आहे.

मात्र या संघर्षाचा आणखी एक पैलू दुर्लक्षित करता येणार नाही. तंत्रज्ञान जर सरकारच्या आदेशानुसार सहज बदलता येत नसेल, तर डिजिटल प्लॅटफॉर्मवरील सरकारी नियंत्रणाची वास्तविक मर्यादा काय?

व्हॉट्सअ‍ॅपवरील नियंत्रणाचा प्रश्न आता केवळ कायद्याचा राहिलेला नाही; तो तंत्रज्ञानाच्या रचनेशी जोडला गेला आहे. त्यामुळे पुढील न्यायालयीन लढाईचा निकाल भारतातील डिजिटल गोपनीयता आणि सोशल मीडिया नियमनाच्या भवितव्याला नवा आकार देऊ शकतो.

## दुपारची झोप मोडली म्हणून एसआयआरला विरोध? पुणेकरांच्या 'धार्मिक कर्तव्यावर' निवडणूक आयोगाची धडक!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे : प्रतिनिधी**

पुणेकरांच्या दुपारच्या झोपेला आता केंद्र सरकारच्या विशेष सघन मतदार पुनरिक्षण मोहिमेने थेट आव्हान दिल्याचं चित्र आहे. मतदार यादी शुद्ध करण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या घराघरातील पडताळणी मोहिमेत पुण्यातील सुमारे अडीच हजार नोंदणी अर्ज अद्याप जमा व्हायचे आहेत. आणि या कामातील सर्वात मोठा अडथळा कोणता? कागदपत्रांचा अभाव नाही, तांत्रिक अडचण नाहीतर पुणेकरांची प्रसिद्ध दुपारची विश्रांती!

पुण्याच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनात दुपारची शांतता ही जवळपास स्वतंत्र परंपराच मानली जाते. मात्र आता दुपारी एक ते चार या वेळेत मतदार पातळीवरील अधिकारी घरी येऊ नयेत, अशी नागरिकांकडून मागणी होत असल्याचं निवडणूक अधिकाऱ्यांचं म्हणणं आहे.

म्हणजे एका बाजूला सरकारचा संदेश

मतदार यादीत तुमचं नाव आहे का, ते तपासा!

आणि दुसऱ्या बाजूला पुणेकरांचा संभाव्य संदेश

नाव राहिलं तर राहू द्या; आधी दुपारची झोप पूर्ण होऊ द्या!

पुण्यात तब्बल आठ हजार ४१७ मतदार पातळीवरील अधिकारी कार्यरत आहेत. त्यापैकी जवळपास पाच हजार ५०० जण शिक्षक आहेत. सकाळी शाळेत शिकवायचं आणि त्यानंतर घराघरात जाऊन मतदारांची माहिती तपासायची, अर्ज वाटायचे आणि जमा करायचेही त्यांची दुहेरी कसरत आहे.

या विशेष सघन पुनरिक्षणाचा उद्देश मतदार यादी अधिक अचूक करण्याचा आहे. मृत व्यक्तींची नावं, दुबार नोंदी आणि स्थलांतरित मतदारांच्या नोंदी तपासण्याचा दावा निवडणूक यंत्रणा करत आहे. १७ ऑगस्टपूर्वी ही प्रक्रिया पूर्ण करण्याचं लक्ष्य आहे.

पण प्रश्न असा लोकशाहीच्या महत्त्वाच्या प्रक्रियेसाठी नागरिकांनी दोन तासांची दुपारची झोप सोडायची नाही, आणि प्रशासनाने नागरिकांच्या वेळेचा विचार करायचा नाही, तर मग हा घरपोच मतदार तपासणीचा प्रयोग नेमका कोणासाठी?

कारण मतदार यादीत नाव टिकवण्यासाठी मतदार जागा झाला पाहिजे आणि अधिकारी दारात पोहोचला पाहिजे!

## महाडीबीटी ९० दिवसांपासून ठप्प! सरकारी योजनांचा लाभ कागदावर, हजारो लाभार्थी मात्र

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या कल्याणकारी योजनांचा लाभ थेट नागरिकांच्या खात्यात पोहोचवण्यासाठी उभारलेले महाडीबीटी पोर्टलच गेल्या तब्बल ९० दिवसांपासून तांत्रिक अडचणींच्या गर्तेत अडकले आहे. सरकारच्या डिजिटल कारभाराचा गवगवा होत असताना प्रत्यक्षात विद्यार्थी, शेतकरी, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, विधवा आणि निराधार लाभार्थ्यांना मात्र योजनांचा लाभ मिळवण्यासाठी सरकारी यंत्रणेच्या तांत्रिक गोंधळाचा सामना करावा लागत आहे.

महाडीबीटी २.० चे अपग्रेडेशन सुरू असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. सुरुवातीला १ ते १५ जूनपर्यंत पोर्टल बंद राहील, त्यानंतर ३० जूनपर्यंत आणि पुढे १५ जुलैपर्यंत सेवा पूर्ववत होईल, अशी आश्वासने देण्यात आली. मात्र ऑगस्ट महिना सुरू होऊनही अनेक सेवा सुरळीत झालेल्या नाहीत. त्यामुळे अर्ज, पडताळणी, मंजुरी आणि अनुदान वितरणाची प्रक्रिया अक्षरशः ठप्प झाली आहे. संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना आणि मुख्यमंत्री वयोश्री योजनेच्या लाभार्थ्यांना याचा मोठा फटका बसला आहे. बेनिफिशरी ॲपवर हयात प्रमाणपत्र सादर करताना नावातील किरकोळ चूक किंवा माहितीतील विसंगती आढळल्यास प्रमाणपत्र स्वीकारले जात नसल्याच्या तक्रारी आहेत. पण दुरुस्तीची यंत्रणाच बंद असल्याने लाभार्थ्यांची अडचण अधिकच वाढली आहे. दुसरीकडे, शिष्यवृत्ती आणि फी माफीसाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांचीही मोठी कोंडी झाली आहे. प्रवेश प्रक्रिया सुरू असताना शिष्यवृत्तीचा अर्ज आणि पडताळणी रखडल्याने विद्यार्थ्यांवर शिक्षणाचा आर्थिक भार वाढण्याची भीती आहे. धक्कादायक बाब म्हणजे काही लाभार्थ्यांना पोर्टलवर अनुदान मंजूर झाल्याचे दिसत असतानाही प्रत्यक्ष रक्कम बँक खात्यात जमा झालेली नाही. प्रश्न आता केवळ तांत्रिक बिघाडाचा नाही. सरकारच्या योजनांचा लाभ देण्यासाठी उभारलेली डिजिटल व्यवस्था नागरिकांच्याच अडचणीचे कारण ठरत असेल, तर या ९० दिवसांच्या विलंबाची जबाबदारी नेमकी कोणाची?

## अर्थखात्यावरून महायुतीत पुन्हा 'रस्सीखेच'? रोहित पवारांचा दावा; शाह-भेटीच्या कथित नकाराने राजकीय चर्चेला उधाण!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई : प्रतिनिधी**

महायुती सरकारमध्ये मंत्रिमंडळातील खातेवाटपाचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाला पुन्हा अर्थखाते मिळणार असल्याच्या चर्चा सुरू असतानाच राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी केलेल्या दाव्यामुळे राजकीय वातावरण तापले आहे. राष्ट्रवादीला अर्थखाते मिळण्याची शक्यता कमी असल्याचा दावा त्यांनी केला आहे.

रोहित पवार यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या मुंबई दौऱ्याचा संदर्भ देत, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची शाह यांच्याशी भेट झाली नसल्याचा दावा केला. या कथित भेटीच्या मुद्द्याचा थेट संबंध अर्थखात्याशी जोडत त्यांनी भाजपकडून अजित पवार गटाची राजकीय ताकद हळूहळू कमी केली जात असल्याचा आरोप केला आहे. मात्र प्रश्न असा आहे खातेवाटपाचा निर्णय खरोखरच एखाद्या नेत्याच्या भेटीवर किंवा राजकीय समीकरणावर ठरणार आहे का? अर्थखाते हे केवळ आणखी एक खाते नाही. राज्याचा अर्थसंकल्प, निधीवाटप आणि विविध विकासकामांच्या आर्थिक प्राधान्यक्रमांवर या खात्याचा मोठा प्रभाव असतो. त्यामुळे हे खाते कोणाकडे राहणार, याकडे महायुतीतील प्रत्येक घटकाचे लक्ष असणे स्वाभाविक आहे. दुसरीकडे, अजित पवारांचे पुत्र जय पवार यांनी यापूर्वीच अर्थखाते राष्ट्रवादीकडे परत येईल, असा दावा केला होता. अजित पवारांच्या अनुपस्थितीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तात्पुरते अर्थखाते स्वतःकडे घेतल्याचे सांगत, लवकरच ते राष्ट्रवादीकडे दिले जाईल, असे आश्वासन मिळाल्याचा दावा जय पवार यांनी केला होता. एकीकडे 'लवकरच खाते मिळेल' असा दावा आणि दुसरीकडे 'अर्थखाते मिळण्याची शक्यता कमी' असा विरोधी दावायामुळे महायुतीतील अंतर्गत समीकरणांबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

## सीजेपी आंदोलनावर केंद्राची शांतता, झारखंडमध्येही तोच पॅटर्न? विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर सरकारांची 'न ऐकण्याची' रणनीती!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**रांची : प्रतिनिधी**

झारखंडमधील विद्यार्थ्यांचे आंदोलन आता अधिक चिघळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. परीक्षा रद्द करण्याची विद्यार्थ्यांची मागणी राज्य सरकारने फेटाळून लावली असून, १० ऑगस्ट रोजी विधानसभेवर मोर्चाचा इशारा देण्यात आला आहे. मात्र या संपूर्ण घडामोडीकडे पाहताना एक मोठा प्रश्न उपस्थित होत आहे विद्यार्थ्यांच्या आंदोलनाकडे दुर्लक्ष करून, वेळ काढण्याची आणि मागण्या वेगवेगळ्या समित्यांकडे ढकलण्याची पद्धत आता सरकारांची नवी रणनीती बनत आहे का?

झारखंड सरकारच्या म्हणण्यानुसार, संबंधित परीक्षा न्यायालयाच्या आदेशानुसार घेण्यात आली असून निकाल जाहीर करून यशस्वी उमेदवारांना नियुक्त्याही देण्यात आल्या आहेत. त्यामुळे परीक्षा सरसकट रद्द करण्याचा अधिकार सरकारकडे नाही. कथित गैरव्यवहारांच्या तपासासाठी राज्य गुन्हे अन्वेषण विभाग आणि आर्थिक व्यवहारांसाठी अंमलबजावणी संचालनालयाकडे चौकशीची प्रक्रिया राबवली जाणार असल्याचे सरकारने सांगितले आहे.

मात्र विद्यार्थ्यांना हा खुलासा मान्य नाही. संपूर्ण प्रकरण सीबीआयकडे सोपवावे, ही त्यांची प्रमुख मागणी आहे. सरकारने निवृत्त न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली सनियंत्रण समिती स्थापन करण्याची तयारी दर्शवली; पण विद्यार्थ्यांनी तीही नाकारली.

या भूमिकेची तुलना अलीकडील 'कॉकरोच जनता पार्टी'च्या (सीजेपी) विद्यार्थी आंदोलनाशी केली जात आहे. विद्यार्थ्यांच्या गंभीर आरोपांवर केंद्र सरकारकडून दीर्घकाळ अपेक्षित तीव्र प्रतिसाद न मिळाल्याची टीका झाली. आंदोलन, अटक, पोलिसी कारवाई आणि परीक्षा व्यवस्थेवरील प्रश्न उपस्थित होत असतानाही सरकारने संवादाऐवजी प्रशासकीय प्रक्रियांवर भर दिल्याचा आरोप आंदोलकांनी केला.

आता झारखंडमध्येही सरकारची भूमिका काहीशी त्याच दिशेने जात असल्याचे चित्र दिसत आहे आंदोलन आहे, मागण्या आहेत, पण सरकारचा निर्णय ठाम!

लोकशाहीत आंदोलन दडपणे हा उपाय नाही आणि विद्यार्थ्यांच्या प्रत्येक मागणीला मान्यता देणेही शक्य नाही. मात्र परीक्षा प्रक्रियेवरील विश्वास डळमळीत झाला असेल, तर स्वतंत्र, निष्पक्ष आणि विश्वासार्ह चौकशी हीच सरकारसमोरील खरी कसोटी आहे.

# महाराष्ट्रात ५२६ 'बेकायदा' शाळा! सरकारची शिक्षणव्यवस्था नेमकी कोणासाठी? १५५ एफआयआरनंतरही प्रश्न कायम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील शिक्षणव्यवस्थेचा चेहरा उजळ दाखवण्याचा प्रयत्न कितीही केला, तरी आकडे सरकारसमोर अस्वस्थ करणारे प्रश्न उभे करत आहेत. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये राज्यात तब्बल ५२६ अनधिकृत शाळा सुरू असल्याची माहिती माहितीच्या अधिकारातून समोर आली आहे. त्यातील तब्बल ४५२ शाळा एकट्या मुंबई विभागातील आहेत. मग इतक्या मोठ्या संख्येने अनधिकृत शाळा उभ्या राहेपर्यंत शिक्षण विभाग नेमका काय करत होता, हा प्रश्न आता विचारावाच लागेल.

शाळेला शासनाची मान्यता आणि यू-डायस क्रमांक असणे बंधनकारक असताना नियम धाब्यावर बसवून शैक्षणिक कामकाज सुरू असल्याचे या आकडेवारीतून दिसते. शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी सामाजिक कार्यकर्ते अभय कोलारकर यांना दिलेल्या आरटीआय माहितीनुसार, राज्यातील अनधिकृत शाळांपैकी ४३ शाळा बंद करण्यात आल्या, १५५ शाळांविरोधात एफआयआर दाखल झाले, तर ४२२ शाळांना नोटीस किंवा दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

पण इथेच सर्वात मोठा प्रश्न उभा राहतो जर शाळा अनधिकृत असल्याचे सरकारला माहिती होते, तर त्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे प्रवेश कसे झाले? आणि कारवाई होऊनही काही ठिकाणी शिक्षण सुरू कसे राहिले?

मुंबई विभागातील आकडे तर अधिक धक्कादायक आहेत. ४५२ अनधिकृत शाळांपैकी केवळ २३ शाळा बंद करण्यात आल्या, तर १४९ शाळांवर एफआयआर दाखल करण्यात आला. ३९६ शाळांवर नोटीस अथवा दंडात्मक कारवाई करण्यात आली. म्हणजे कारवाईची नोंद मोठी असली, तरी प्रत्यक्षात विद्यार्थ्यांना सुरक्षित आणि अधिकृत शिक्षणव्यवस्था मिळते आहे का? हा प्रश्न अनुत्तरितच आहे.

पुणे विभागात ५३, नागपूरमध्ये ११, नाशिकमध्ये ४, संभाजीनगरमध्ये ४ आणि अमरावतीमध्ये २ अनधिकृत शाळांची नोंद झाली आहे. कोल्हापूर आणि लातूर विभागात एकही शाळा नोंदली नसल्याचे आरटीआयमधून समोर आले आहे.

सरकारकडून शिक्षणाच्या गुणवत्तेचे, डिजिटल शिक्षणाचे आणि शाळांच्या आधुनिकीकरणाचे दावे केले जात असताना मान्यताच नसलेल्या शाळांमध्ये हजारो विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात येत असेल, तर त्या दाव्यांचे वास्तव काय?

आणखी गंभीर बाब म्हणजे या विषयावर सरकारकडून व्यापक सार्वजनिक स्पष्टीकरण किंवा जबाबदारी निश्चित करण्याबाबत ठोस भूमिका समोर येताना दिसत नाही. नोटीस, दंड आणि एफआयआर ही कारवाईची साधने आहेत; पण विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये, याची हमी कोण देणार?

अनधिकृत शाळा सुरू करणाऱ्यांवर कारवाई झालीच पाहिजे. पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे, अशा शाळांना वेळेत ओळखण्यात आणि बंद करण्यात प्रशासन अपयशी का ठरले?

## संपादकीय

### जंतर-मंतरनंतर महिलांनाच टार्गेट का?

आंदोलन संपले; पण डिजिटल हिंसा सुरूच! महिलांच्या आवाजाला गप्प करण्याचा हा नवा मार्ग?

जंतर-मंतरवरील आंदोलन संपले. मंच रिकामा झाला. घोषणा थांबल्या. आंदोलक आपापल्या घरी परतले. पण आंदोलनानंतर सोशल मीडियावर एक वेगळाच संघर्ष सुरू झालाआणि या संघर्षाचे लक्ष्य ठरल्या आंदोलनात सहभागी झालेल्या महिला.

फोटो शोधले गेले. काही फोटो बदलले किंवा मॉर्फ केल्याचे आरोप झाले. अखच्या माध्यमातून बनावट प्रतिमा तयार करून पसरवल्याच्या घटना समोर आल्या. काहींची वैयक्तिक माहिती शोधण्याचे प्रयत्न झाले. फोन नंबर आणि कुटुंबीयांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न झाल्याचे आरोप झाले. काही महिलांना बलात्कार आणि जीवे मारण्याच्या धमक्यांना सामोरे जावे लागल्याचेही सांगण्यात आले.

मग प्रश्न साधा आहेआंदोलनात पुरुषही होते. पुरुषांनीही आक्रमक भाषा वापरली. त्यांचेही व्हिडिओ होते. मग महिलांनाच त्यांच्या शरीरावर, चारित्र्यावर, कपड्यांवर आणि लैंगिकतेवरून लक्ष्य करण्याची गरज का भासली?

हा प्रश्न केवळ जंतर-मंतरपुरता मर्यादित नाही. हा प्रश्न भारतीय लोकशाहीतील महिलांच्या सार्वजनिक सहभागाचा आहे.

टीका करा; पण धमकी का? एखाद्या आंदोलकाचे वक्तव्य आक्षेपार्ह असेल तर त्यावर टीका करण्याचा पूर्ण अधिकार आहे. तथ्य चुकीचे असेल तर तथ्य मांडता येतात. कायदा मोडला असेल तर तक्रार करता येते आणि कायदेशीर प्रक्रिया होऊ शकते. पण एखाद्याचा घरचा पत्ता शोधणे, फोन नंबर सार्वजनिक करणे, कुटुंबीयांना लक्ष्य करणे, फोटो मॉर्फ करणे किंवा बलात्काराची धमकी देणेही राजकीय टीका आहे का? नाही. ही टीका नाही. ही भीती निर्माण करण्याची पद्धत आहे. आणि जेव्हा एखाद्या महिलेवर तिच्या स्त्रीत्वाला लक्ष्य करून हल्ला केला जातो, तेव्हा हा साधा ऑनलाइन ट्रोलिंगचा प्रकार राहत नाही. तो सशपवशअॅशव हरॲरीाशपीं, म्हणजेच लैंगिक स्वरूपाचा डिजिटल छळ ठरतो.

श्रद्धा सिंह प्रकरण काय सांगते?

जंतर-मंतर आंदोलनादरम्यान श्रद्धा सिंह यांनी सुरक्षा दलाशी संबंधित एक व्हिडिओ सोशल मीडियावर पोस्ट केला. त्यानंतर त्यांच्यावर मोठ्या प्रमाणात टीका झाली. त्यांनी आपल्या पोस्टबाबत स्पष्टीकरण देत माफीही मागितली. मात्र त्यानंतरही ऑनलाइन छळ आणि धमक्यांचा सामना करावा लागल्याचा त्यांचा आरोप आहे. त्यांच्या जुन्या फोटोमधून वाहनाचा नंबर शोधून वैयक्तिक माहिती मिळवण्याचा प्रयत्न झाल्याचेही त्यांनी सांगितले. इथे पुन्हा प्रश्न उभा राहतो एखाद्या पोस्टला विरोध करण्यासाठी तुम्हाला त्या व्यक्तीच्या घरापर्यंत पोहोचण्याची गरज का पडते? राजकीय मतभेद वैयक्तिक सूडात बदलले की लोकशाहीचा संवाद संपतो आणि दहशतीची भाषा सुरू होते. अल्पवयीन मुलगी आणि जबाबदारीचा प्रश्न या आंदोलनाशी संबंधित एका अल्पवयीन मुलीचा व्हिडिओही चर्चेत आला. तिने पंतप्रधानांविरोधात आक्षेपार्ह भाषा वापरल्याचा आरोप झाला आणि तिच्याविरोधात कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात आली. कायदा मोडला असेल तर कायदा आपले काम करेल. पण त्या मुलीची ओळख सोशल मीडियावर उघड करणे, तिची वैयक्तिक माहिती पसरवणे किंवा तिला ऑनलाइन जमावाच्या निशाण्यावर उभे करणेहा वेगळा प्रश्न आहे. कायद्याचा हात असताना डिजिटल जमावाचा हात का हवा? विशेषतः ती अल्पवयीन असेल, तर तिची ओळख सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी समाजाची आणि माध्यमांचीही आहे. महिला नेतृत्व करते तेव्हा अस्वस्थता वाढते का? जंतर-मंतर आंदोलनात महिलांची भूमिका केवळ प्रेक्षक किंवा समर्थक म्हणून नव्हती. त्या आंदोलनात सहभागी झाल्या, उपोषण केले, माध्यमांशी संवाद साधला आणि सरकारला प्रश्न विचारले. आणि कदाचित याच ठिकाणी भारतीय समाजातील एक अस्वस्थ करणारा प्रश्न समोर येतो स्त्रीने विरोध करणे चालते; पण स्त्रीने नेतृत्व करणे अजूनही काहींना का खटकते? पुरुष सत्तेला प्रश्न विचारतो तेव्हा त्याला 'आक्रमक', 'राजकीय' किंवा 'बंडखोर' म्हटले जाऊ शकते. पण महिला त्याच पद्धतीने प्रश्न विचारते तेव्हा चर्चा अनेकदा तिच्या कपड्यांवर, दिसण्यावर, चारित्र्यावर किंवा वैयक्तिक आयुष्यावर का वळते? हीच **gendered harassment**ची मूळ समस्या आहे. महिलेच्या राजकीय भूमिकेला उत्तर देण्याऐवजी तिच्या स्त्री असण्यालाच तिच्याविरुद्ध शस्त्र बनवले जाते.

आता अखने धोका आणखी वाढवला आहे डिजिटल छळाची पुढची पायरी आणखी धोकादायक आहे**AI-generated images** आणि **deepfakes.** एखाद्या महिलेचा चेहरा घेऊन बनावट अश्लील प्रतिमा तयार करणे आणि ती प्रतिमा एखाद्या आंदोलनाशी जोडणे आज तांत्रिकदृष्ट्या तुलनेने सोपे झाले आहे. कल्पना करा तुमचा चेहरा अश्लील बनावट फोटोवर लावला जातो. तो फोटो हजारो लोकांपर्यंत पोहोचतो. नंतर तो बनावट असल्याचे सिद्ध झाले तरी पहिली छाप पुसता येते का? इथेच तंत्रज्ञान महिलांविरोधातील जुन्या मानसिकतेला नवे हत्यार देते. पूर्वी अफवा एका गावात पसरायची. आता ती काही मिनिटांत लाखो लोकांपर्यंत पोहोचू शकते. पूर्वी फोटो बदलण्यासाठी तांत्रिक कौशल्य आवश्यक होते. आता अखने ते अधिक सुलभ केले आहे.

डिजिटल हिंसेचा खरा उद्देश काय? महिलेला अटक करण्याची गरज नसते. तिच्यावर थेट बंदी घालण्याची गरज नसते. तिला एवढी भीती दाखवा की ती पुढच्या आंदोलनात स्वतःहून जाणार नाही. तिच्या मनात प्रश्न निर्माण करा 'माझा फोटो व्हायरल झाला तर?' 'माझा नंबर शोधला तर?' 'माझ्या कुटुंबाला धमक्या दिल्या तर?' 'माझ्यावर मॉर्फ फोटो तयार केला तर?' 'माझ्या कॉलेज किंवा कार्यालयात तो पोहोचला तर?' यालाच व्यापक अर्थाने **chilling effect** म्हणता येईल. एखाद्या व्यक्तीला गप्प करण्यापेक्षा इतर शंभर लोकांना बोलण्याची भीती वाटावी, अशी परिस्थिती निर्माण करणे हा त्याहून मोठा लोकशाहीविरोधी परिणाम आहे.

हा केवळ भारताचा प्रश्न नाही

जगभरातील अनेक आंदोलनांमध्ये महिलांनी नेतृत्व केले आहे आणि त्यांना राजकीय दडपशाहीसोबत लैंगिक स्वरूपाच्या हल्ल्यांचाही सामना करावा लागला आहे. इराणच्या **"Woman, Life, FA°eedom'** आंदोलनापासून बेलारूस, चीन आणि सुदानपर्यंत विविध ठिकाणी महिला कार्यकर्त्यांवर लैंगिक धमक्या, बदनामी, कुटुंबीयांना लक्ष्य करणे आणि लैंगिक हिंसेची भाषा वापरल्याच्या घटना नोंदल्या गेल्या आहेत. देश वेगळे. राजकीय व्यवस्था वेगवेगळ्या. संघर्ष वेगवेगळे. पण पॅटर्न अनेकदा एकच महिला सार्वजनिक विरोधाचा चेहरा बनली की राजकीय हल्ला अनेकदा वैयक्तिक आणि लैंगिक हल्ल्यात बदलतो. मग जंतर-मंतर आपल्याला काय शिकवते? या संपूर्ण प्रकरणाकडे दोन टोकांच्या भूमिकेतून पाहणे सोपे आहे. एक म्हणेलआंदोलकांनी चुकीची भाषा वापरली, त्यामुळे त्यांच्यावर टीका झाली. दुसरा म्हणेलमहिलांना मुद्दाम लक्ष्य केले गेले. दोन्ही बाजूंमधील सत्य वेगळे करण्यासाठी एक साधी रेषा आखावी लागेल. टीका कुठे संपते आणि डिजिटल हिंसा कुठे सुरू होते? वक्तव्यावर टीकालोकशाही. कायद्याचे उल्लंघन झाल्यास तक्रारलोकशाही. पण फोन नंबर शोधणेछळ. घरचा पत्ता पसरवणेधोकादायक छळ. **AI**च्या माध्यमातून अश्लील फोटो तयार करणेडिजिटल हिंसा. बलात्काराची धमकी देणेहिंसा. कुटुंबीयांना धमकावणेदहशतीचे राजकारण. या सगळ्याला 'राजकीय विरोध' म्हणणे म्हणजे शब्दांचा गैरवापर आहे. प्रश्न महिलांचा नाही; प्रश्न लोकशाहीचा आहे आपण मुलींना लहानपणापासून काय सांगतो? 'जास्त बोलू नकोस.' 'वादात पडू नकोस.' 'राजकारणापासून दूर राहा.' 'लोक काय म्हणतील?' 'घरची बदनामी होईल.' ही मानसिकता सोशल मीडियाच्या युगात नव्या रूपात परत आली आहे. आता 'गप्प बस' एवढेच सांगितले जात नाही. आता संदेश असा असू शकतो 'बोलशील तर तुझा फोटो व्हायरल करू.' 'प्रश्न विचारशील तर तुझी माहिती शोधू.' 'आंदोलनात उभी राहशील तर तुला बदनाम करू.' ही लोकशाहीची भाषा नाही. उद्या तुमची मुलगीही प्रश्न विचारू शकते आज जंतर-मंतरवर उभी असलेली महिला तुम्हाला आवडत नसेल. तिची भाषा आवडत नसेल. तिचे राजकारण आवडत नसेल. तिच्या मागण्या चुकीच्या वाटत असतील. ठीक आहे. तिच्यावर टीका करा. तिच्या भूमिकेला विरोध करा. तथ्यांनी उत्तर द्या. कायदा मोडला असेल तर कायद्याचा आधार घ्या. पण तिच्या स्त्रीत्वाला तिच्याविरुद्ध हत्यार बनवू नका. कारण आज ती जंतर-मंतरवर आहे. उद्या कदाचित तुमची मुलगी विद्यापीठात प्रश्न विचारत असेल. तुमची बहीण निवडणुकीत उभी असेल. तुमची पत्नी एखाद्या आंदोलनाचे नेतृत्व करत असेल. आणि कदाचित एक दिवस तुम्ही स्वतः सत्तेला प्रश्न विचारत असाल तेव्हा प्रश्न असा असेल 'आपण प्रश्न विचारण्याची किंमत किती ठेवली आहे?' जर त्या किंमतीत बदनामी, वेळपस, लैंगिक धमक्या, मॉर्फिंग आणि **AI-generated humiliation** समाविष्ट असेल, तर आपण फक्त महिलांना गप्प करत नाही. आपण लोकशाहीच्या सार्वजनिक जागेलाच छोटं करत आहोत. म्हणून जंतर-मंतरनंतर महिलांना लक्ष्य करण्याच्या घटनांकडे केवळ एका आंदोलनाच्या राजकीय वादाच्या चौकटीत पाहणे पुरेसे नाही. हा प्रश्न महिलांच्या सार्वजनिक सहभागाचा आहे. डिजिटल युगातील अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा आहे. आणि त्याहून महत्त्वाचे म्हणजेआपल्याला न पटणाऱ्या आवाजाला आपण उत्तर देणार आहोत की तो आवाजच बंद करण्याचा प्रयत्न करणार आहोत, याचा आहे. लोकशाहीची खरी परीक्षा आपल्या विचारांशी सहमत असलेले लोक बोलतात तेव्हा होत नाही. आपल्याला न पटणारी व्यक्ती समोर उभी राहून प्रश्न विचारते, तेव्हा होते. तिचे मत चुकीचे असेल तर उत्तर द्या. तिची भाषा चुकीची असेल तर टीका करा. कायदा मोडला असेल तर कायदेशीर कारवाई करा. पण तिच्या स्त्रीत्वावर हल्ला करू नका. कारण महिलांना गप्प करण्यासाठी वापरलेली डिजिटल हिंसा शेवटी संपूर्ण समाजाच्या बोलण्याच्या अधिकारावरच हल्ला करते.

# संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचे पिंपरी गावात उत्साहात आगमन

## पंढरपूरहून विठुरायाचे दर्शन घेऊन देहूकडे परतीचा प्रवास; महापालिकेकडून भक्तिमय वातावरणात स्वागत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी**

पंढरपूर येथे विठुरायाचे दर्शन घेऊन देहूकडे परतीच्या प्रवासाला निघालेल्या संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचे पिंपरी गावात उत्साहात आगमन झाले. पालखी सोहळ्याचे पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले.



पालखीचे आगमन होताच पिंपरी गाव परिसरात वारकऱ्यांची मोठी गर्दी झाली. 'ज्ञानोबा-तुकाराम'च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. विठ्ठल-रखुमाईच्या नामस्मरणात तल्लीन झालेल्या वारकऱ्यांमुळे संपूर्ण परिसराला भक्तीचे स्वरूप प्राप्त झाले.

पंढरपूरची वारी पूर्ण करून देहूकडे परतणाऱ्या वारकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान आणि भक्तिभाव दिसून येत होता. पालखी सोहळ्याच्या स्वागतासाठी स्थानिक नागरिकांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहत वारकऱ्यांचे उत्साहात स्वागत केले.

महापालिकेच्या वतीने पालखी सोहळ्यासाठी आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. पालखी मार्गावर नागरिक आणि वारकऱ्यांची गैरसोय होऊ नये, यासाठी प्रशासनाकडून आवश्यक नियोजन करण्यात आले होते.

# मुसळधार पावसामुळे सांगवी पोस्ट ऑफिसमध्ये पाणी

## कार्यालय दापोडीत तात्पुरते स्थलांतरित; नवीन सुसज्ज कार्यालयाची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी । प्रतिनिधी**

शहरात झालेल्या मुसळधार पावसाचा फटका सांगवी येथील पोस्ट ऑफिसलाही बसला. कार्यालयात पुराचे पाणी शिरल्याने महत्त्वाची सरकारी कागदपत्रे आणि दस्तऐवज भिजून मोठे नुकसान झाले. नागरिकांच्या सुरक्षिततेसह कार्यालयीन कामकाज सुरळीत ठेवण्यासाठी सांगवी पोस्ट ऑफिसचे कामकाज तात्पुरत्या स्वरूपात दापोडी येथे स्थलांतरित करण्यात आले आहे.

सांगवी परिसरात पावसाच्या काळात वारंवार पाणी साचण्याच्या समस्येला नागरिकांना सामोरे जावे लागत आहे. पोस्ट ऑफिसमध्ये पाणी शिरल्याने शासकीय दस्तऐवजांचे नुकसान होण्याची घटना समोर आल्याने नागरिकांमध्येही चिंता व्यक्त होत आहे.

दरम्यान, या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी सांगवी परिसरात नवीन, सुरक्षित आणि सुसज्ज पोस्ट ऑफिसची व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी ज्येष्ठ नागरिक सुनील पोखरे यांनी केली आहे.

वारंवार पावसाच्या पाण्याचा फटका बसणाऱ्या विद्यमान कार्यालयाऐवजी सुरक्षित ठिकाणी नवीन कार्यालय उभारल्यास नागरिकांची गैरसोय टाळता येईल, तसेच महत्त्वाच्या शासकीय कागदपत्रांचेही संरक्षण होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त क्रांतिकारकांना अभिवादन

## मुख्य क्रांती स्मारक परिसरात भावपूर्ण कार्यक्रम; 'हुतात्म्यांचा देशप्रेमाचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचवणे ही जबाबदारी'

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पिंपरी-चिंचवड : ऑगस्ट क्रांती दिनाचे औचित्य साधून पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने देशाच्या स्वातंत्र्यलढ्यातील थोर क्रांतिकारकांना भावपूर्ण अभिवादन करण्यात आले. महापालिकेच्या मुख्य क्रांती स्मारक परिसरात आयोजित कार्यक्रमात विविध क्षेत्रांतील लोकप्रतिनिधी आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनी हुतात्म्यांच्या स्मृतीस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली.

यावेळी उपस्थितांना संबोधित करताना उपमहापौरांनी स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाचा गौरव केला. ते म्हणाले, देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या महान सुपुत्रांमुळेच आज आपण स्वतंत्र भारतात जगत आहोत. क्रांतिकारकांचा त्याग, अतुलनीय संघर्ष आणि बलिदान हे आपल्या इतिहासातील अमूल्य सुवर्णपान आहे. हुतात्म्यांचे विचार आणि देशप्रेमाची भावना पुढील पिढीपर्यंत पोहोचवणे ही प्रत्येक नागरिकाची नैतिक जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले. राष्ट्राच्या प्रगतीसोबतच राष्ट्रीय एकात्मता अधिक बळकट करण्यासाठी नागरिकांनी सक्रिय योगदान द्यावे, असे आवाहनही त्यांनी केले. कार्यक्रमाला महापालिकेचे लोकप्रतिनिधी, वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. क्रांती स्मारक परिसरात हुतात्म्यांच्या स्मृतीला अभिवादन करून देशाच्या स्वातंत्र्यलढ्यातील त्यांचे योगदान कृतज्ञतेने स्मरण करण्यात आले.

# तक्रारींची वाट पाहू नका; अधिकाऱ्यांनी थेट रस्त्यावर उतरावे

## रस्ते, पदपथ, रेलिंग व दुभाजकांची पाहणी करून तातडीने दुरुस्तीचे आदेश; निष्काळजीपणा आढळल्यास कडक कारवाई : आयुक्त सूर्यवंशी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी । प्रतिनिधी**

नागरिकांच्या तक्रारींची वाट पाहण्याऐवजी महापालिका अधिकाऱ्यांनी स्वतः रस्त्यावर उतरून शहरातील विविध भागांची पाहणी करावी, असे स्पष्ट आदेश पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त सूर्यवंशी यांनी दिले आहेत. अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्यांची तातडीने दखल घ्यावी, असे निर्देशही त्यांनी दिले.

या आदेशानंतर शहरातील रस्ते, पदपथ, रेलिंग आणि दुभाजकांच्या दुरुस्तीच्या कामांना वेग आला आहे. पावसामुळे किंवा अन्य कारणांमुळे खराब झालेल्या रस्त्यांची तसेच सार्वजनिक सुविधांची पाहणी करून आवश्यक ती दुरुस्ती तातडीने करण्याच्या सूचना संबंधित विभागांना देण्यात आल्या आहेत.

नागरिकांच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतरच कारवाई करण्याची पद्धत न ठेवता अधिकाऱ्यांनी नियमितपणे क्षेत्रीय पाहणी करून समस्या आधीच ओळखाव्यात, अशी भूमिका आयुक्तांनी स्पष्ट केली.

# अनुसूचित जाती आरक्षणाच्या वर्गीकरणाच्या समर्थनार्थ १८ ऑगस्टला जनआक्रोश मोर्चा

## मातंग समाज कृती समितीचा निर्णय; चिंचवड स्टेशन ते निगडी तहसील कार्यालयापर्यंत मोर्चा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी । प्रतिनिधी**

अनुसूचित जातींच्या (डउ) आरक्षणामध्ये 'अ, ब, क, ड' वर्गीकरण करण्याच्या मागणीला पाठिंबा देण्यासाठी पिंपरी-चिंचवड शहरातील मातंग समाज कृती समितीच्या वतीने १८ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११ वाजता शांततापूर्ण 'जनआक्रोश मोर्चा' काढण्यात येणार आहे.

या मोर्चाची सुरुवात गुरुवर्य लहुजी वस्ताद साळवे पुतळा, चिंचवड स्टेशन येथून होणार असून, मोर्चा चिंचवड स्टेशनमार्गे निगडी तहसील कार्यालयापर्यंत नेण्यात येणार आहे. अनुसूचित जाती आरक्षणाचा लाभ समाजातील सर्व घटकांना न्याय्य पद्धतीने मिळावा आणि सामाजिक न्यायाच्या दृष्टीने आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्यात यावे, या मागणीसाठी हा मोर्चा आयोजित करण्यात आला आहे. या मागणीला वाल्मिकी, मादिगा आणि खाटिक समाजानेही पाठिंबा दर्शविला असून संबंधित समाजबांधव मोर्चात सहभागी होणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

आरक्षणाच्या उपवर्गीकरणाच्या मागणीसाठी लोकशाही आणि शांततापूर्ण मार्गाने शासनाचे लक्ष वेधणे हा मोर्चाचा प्रमुख उद्देश आहे. पिंपरी-चिंचवड शहर तसेच परिसरातील मातंग आणि संबंधित समाजातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन मातंग समाज कृती समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# चिखलीत सार्वजनिक रस्त्यावरून चोरीचा गुन्हा दाखल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी : प्रतिनिधी**

पोलीस ठाणे: चिखली पोलीस ठाणे (गु.र.नं. ५२४/२०२६)

कलम: इछड ३०३(२) (भा.दं. वि. ३७९)

घटनास्थळ: रुपनगर पोलीस चौकीजवळ, तळवडे

काय घडले? फिर्यादी मोहित कुमार रामेश्वर यादव (वय ३०) याच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्याविरोधात सार्वजनिक रस्त्यावरून साहित्य/माल चोरी केल्याप्रकरणी गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

**शिरगाव येथे भरधाव कारच्या धडकेत १७ वर्षीय मुलगा गंभीर जखमी**

पोलीस ठाणे: शिरगाव पोलीस ठाणे (गु.र.नं. २०७/२०२६)

कलम: इछड २८१, १२५(अ), १२५(ब), ३२४(४) (भा.दं.वि. २७९, ३३७, ३३८)

घटनास्थळ: गहुंजे रोड, सैनिक स्कूलजवळ, शिरगाव

काय घडले? आरोपी तुळशीराम गोविंदराव मुळुकपाडे (वय २९) याने आपल्या ताब्यातील स्विफ्ट डिझायर कार (चक १२ धइ ०१३८) हयगयीने व बेपरवाईने चालवून दुचाकीस्वार अभिषेक सुनील शर्मा (वय १७) याच्या हिरो स्प्लेंडर प्लस (चक १४ छछ ०४३८) गाडीला जोरात धडक दिली. या अपघातात अभिषेकच्या डोक्याला आणि मांडीच्या हाडाला गंभीर फ्रॅक्चर झाले असून दोन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे.

तपास अधिकारी: पोउपनि शेख (८३००९९११९९ / ९८३४४६८६६८)

**पैशांच्या देवाणघेवाणीवरून चाकणमध्ये पती-पत्नीला बेदम मारहाण**

पोलीस ठाणे: दक्षिण चाकण पोलीस ठाणे (गु.र.नं. ००७/२०२६)

कलम: इछड ११८(१), ३५१(२), ३५२, ३(५), ३२९(४) (भा.दं.वि. ३२४, ५०६, ५०४, ३४)

घटनास्थळ: मेदनकरवाडी (ता. खेड)

काय घडले? फिर्यादी कानिफनाथ जालिंधर शिंदे व त्यांच्या पत्नी कोमल शिंदे यांना दिलेल्या पैशांच्या वसुलीच्या कारणावरून आरोपी प्रजा प्रविण तापकीर (वय २२), प्रविण शिवाजी तापकीर (वय ३५) आणि सारिका बाळासाहेब उमले (वय ४५) यांनी बेकायदेशीर एकत्र येत, केबल आणि लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली.





तपास अधिकारी: पोउपनि सुकाळे (९५९४९६८१११ / ९९२२१०२५३३)

**दारूसाठी पैसे न दिल्याने तळेगाव दाभाडे येथे एकावर काठीने प्राणघातक हल्ला**

पोलीस ठाणे: तळेगाव दाभाडे पोलीस ठाणे (गु.र.नं. २८५/२०२६)

कलम: इछड ११८(१), ३(५) (भा.दं.वि. ३२४)

घटनास्थळ: वीर चक्र चौक, तळेगाव दाभाडे (देशी दारूचे दुकान)

काय घडले? फिर्यादी अभिजित अशोक धर्माधिकारी (वय ४८) हे देशी दारूच्या दुकानाजवळ असताना, आरोपी मंगेश सांडभोर व किरण (पूर्ण नाव माहीत नाही) व इतर यांनी दारू पिण्यासाठी उसने पैसे मागितले. पैसे देण्यास नकार दिल्याने आरोपींनी फिर्यादीस धक्काबुक्की करत डोक्यात काठी मारून गंभीर जखमी केले.

तपास अधिकारी: पोउपनि खामगाळ (९५६१०५५८८१ / ९८५०९८३०१३)

**ब्लॅकमेलिंग आणि मानसिक त्रासाला कंटाळून १२ व्या मजल्यावरून उडी मारून तरुणाची आत्महत्या**

पोलीस ठाणे: भोसरी पोलीस ठाणे (गु.र.नं. ३१८/२०२६)

कलम: भारतीय न्याय संहिता (इछड) कलम १०८ (भा.दं.वि. ३०६ - आत्महत्येस प्रवृत्त करणे)

घटनास्थळ: गव्हाणे पेट्रोलपंपामागे, भोसरी (डीस्टिनेशन क्षितिज सोसायटी, ऋ-विंग)

काय घडले? फिर्यादी पेमाराम लसाराम चौधरी (वय ५८) यांच्या २६ वर्षीय मुलगा विनोद चौधरी याने इमारतीच्या १२ व्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या केली. आरोपी सरोज नागनाथ माने या महिलेने विनोदच्या दुकानात सोन्याची झुमकी पडल्याचा खोटा आरोप करून, चोरीची तक्रार करण्याची धमकी देऊन ५५ हजार रुपयांची मागणी केली होती. सततचा मानसिक त्रास व खंडणीच्या धमकीला कंटाळून विनोदने हे टोकाचे पाऊल उचलल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

तपास अधिकारी: सपोनि मांजरे (मो. ८८८८६०२९२० / ७८७५८२७२९३)

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### पाच वर्षांत एक लाख उद्योजक घडविण्याचा संकल्प

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे : प्रतिनिधी

मराठा समाजातील युवक, महिला, शेतकरी आणि नवउद्योजकांना उद्योग-व्यवसायाच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने पुणे जिल्ह्यात 'बिझनेस ग्रोथ अँड अपॉर्च्युनिटी कॉन्क्लेव्ह २०२६'चे आयोजन करण्यात आले. 'मराठा उद्योजक विकास व मार्गदर्शन संस्था' यांच्या वतीने आयोजित या परिषदेत पुढील पाच वर्षांत एक लाख नवे उद्योजक घडविण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला.

उद्योजकांनी परस्पर सहकार्य, व्यावसायिक नेटवर्किंग, डिजिटल मार्केटिंग आणि निर्यातीच्या संधींचा प्रभावीपणे लाभ घ्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले. बदलत्या आर्थिक परिस्थितीत पारंपरिक व्यवसायांसोबतच आधुनिक तंत्रज्ञान, डिजिटल माध्यमे आणि जागतिक बाजारपेठेचा वापर करून उद्योगवाढ साधण्यावर परिषदेत भर देण्यात आला.

या परिषदेला पुरुषोत्तम खेडेकर, संजय वायाळ, राजेंद्र पाटील, अर्जुन खामकर, रामदास काकडे, शरद काळे, अविनाश जोगदंड, विजय सावंत यांच्यासह विविध क्षेत्रांतील उद्योजक उपस्थित होते. दरम्यान, आगामी १५ ते १८ ऑक्टोबरदरम्यान मोशी येथे 'ग्लोबल मराठा बिझनेस एक्स्पो २०२६'चे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. या प्रदर्शनात महिला उद्योजकांसाठी सुमारे २५० स्टॉल्स राखीव ठेवण्यात येणार आहेत.

# पुणे-नाशिक रेल्वेसाठी टप्प्याटप्प्याने आंदोलन तीव्र करणार

## मंचरमधील रास्ता रोकोला उत्स्फूर्त प्रतिसाद; शेतकरी, विद्यार्थी, कामगारांसाठी रेल्वेमार्ग ठरणार महत्त्वाचा : दिलीप वळसे पाटील

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मंचर । प्रतिनिधी

पुणे-नाशिक रेल्वे मार्ग हा उत्तर पुणे जिल्ह्याच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा असून, या प्रकल्पासाठी यापुढे टप्प्याटप्प्याने आंदोलन तीव्र करण्याचा निर्धार माजी मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी व्यक्त केला.

पुणे-नाशिक रेल्वे मार्गाच्या मागणीसाठी मंचर येथे आयोजित करण्यात आलेल्या रास्ता रोको आंदोलनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी वळसे पाटील बोलत होते.

वळसे पाटील म्हणाले, पुणे-नाशिक रेल्वे मार्गासाठी गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. हा मार्ग केवळ प्रवाशांच्या दृष्टीने महत्त्वाचा नसून, शेतकरी, विद्यार्थी आणि औद्योगिक क्षेत्रातील कामगारांसाठीही मोठा आधार ठरणार आहे. पुण्यात शिक्षणासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना तसेच चाकण औद्योगिक परिसरात काम करणाऱ्या कामगारांना या रेल्वेमार्गाचा मोठा फायदा होईल.

पुणे आणि नाशिक या दोन प्रमुख बाजारपेठांमध्ये शेतीमालाची वाहतूक करण्यासाठीही हा रेल्वेमार्ग उपयुक्त ठरणार आहे.



तसेच शिर्डी विमानतळाच्या माध्यमातून शेतीमाल परदेशातील बाजारपेठांपर्यंत पोहोचविण्यासाठी रेल्वेचा उपयोग होऊ शकतो. परिसरातील प्रस्तावित विमानतळ अन्यत्र गेल्याने उत्तर पुणे जिल्ह्याच्या विकासाच्या दृष्टीने पुणे-नाशिक रेल्वे मार्गाची गरज आणखी अधोरेखित झाली आहे, असे वळसे पाटील यांनी सांगितले.

यावेळी भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष बाळासाहेब बेंडे, जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील, प्रदीप वळसे पाटील, पूर्वा वळसे पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष विष्णू हिंगे, सभापती कैलासबुवा काळे, बाजार समितीचे सभापती निलेश थोरात, नवनाथ हुले, सुषमा शिंदे, शरद बँकेचे संचालक अजय घुले, नगरसेवक धनेश मोरडे आदी उपस्थित होते.

यावेळी पूर्वा वळसे पाटील, राजू इनामदार आणि गणेश कसबे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रमेश खिलारी यांनी केले, तर आभार सुहास बाणखेले यांनी मानले.

## अमेरिकेतील नातेवाईकाच्या कागदपत्रांचा गैरवापर; ३२ लाखांच्या अपहाराचा आरोप

### बारामती दूध संघाच्या संचालकासह पत्नीविरुद्ध गुन्हा दाखल; पोलिसांकडून तपास सुरू

■ दैनिक राज्य लोकतंत्र

बारामती । प्रतिनिधी

अमेरिकेत वास्तव्यास असलेल्या नातेवाईकाच्या महत्त्वाच्या कागदपत्रांचा कथित गैरवापर करून ३२ लाख रुपयांचा अपहार केल्याप्रकरणी बारामती दूध संघाच्या संचालकासह त्यांच्या पत्नीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अमेरिकेत राहणाऱ्या एका नातेवाईकाच्या महत्त्वाच्या दस्तऐवजांचा गैरवापर करून आर्थिक व्यवहार करण्यात आल्याचा आरोप आहे. या माध्यमातून संबंधित रकमेचा अपहार झाल्याची तक्रार पोलिसांकडे करण्यात आली.

तक्रारीच्या आधारे पोलिसांनी संबंधित जोडप्याविरुद्ध गुन्हा नोंदवला असून, कागदपत्रांचा नेमका कसा वापर करण्यात आला, आर्थिक व्यवहार कोणत्या पद्धतीने झाले आणि त्यामध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास सुरू आहे.

## महाळुंगे पडवळ येथे हुतात्मा बाबू गेनू सैद यांना अभिवादन

### क्रांतिदिनानिमित्त स्मृतिस्तंभाला पुष्पचक्र अर्पण; विद्यार्थ्यांनी देशप्रेम व सामाजिक बांधिलकी जपावी : दिलीप वळसे पाटील

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मंचर । प्रतिनिधी

क्रांतिदिनानिमित्त महाळुंगे पडवळ (ता. आंबेगाव) येथे देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात प्राणांचे बलिदान देणारे हुतात्मा बाबू गेनू सैद यांच्या स्मृतिस्तंभाला माजी मंत्री तथा आमदार दिलीप वळसे पाटील आणि प्रांताधिकारी अर्चना तांबे यांच्या हस्ते पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी बोलताना दिलीप वळसे पाटील म्हणाले की, हुतात्मा बाबू गेनू सैद यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणांचे बलिदान देत स्वातंत्र्यलढ्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांच्या त्यागातून विद्यार्थ्यांनी प्रेरणा घेत देशप्रेम, कर्तव्यनिष्ठा,



प्रामाणिकपणा, राष्ट्रीय एकात्मता आणि सामाजिक बांधिलकी जोपासली पाहिजे.

महाळुंगे पडवळ येथील सभागृहाचा प्रश्नही लवकरच मार्गी लावण्यात येईल. पंचक्रोशीतील विविध रस्त्यांच्या कामांना मंजुरी मिळाली असून, अद्याप प्रलंबित असलेली विकासकामेही टप्प्याटप्प्याने पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे वळसे पाटील यांनी सांगितले.

यावेळी प्रांताधिकारी अर्चना तांबे आणि दादाभाऊ चासकर यांनी मनोगत व्यक्त केले. हुतात्मा बाबू गेनू सैद यांचे पुतणे के. के. सैद यांनी प्रास्ताविक केले.

कार्यक्रमाला पूर्वा वळसे पाटील, उपसभापती ज्योती पारधी, माजी सभापती उषाताई कानडे, सचिन भोर, जीएसटीचे अप्पर आयुक्त संजीव सैद पाटील, नायब तहसीलदार सचिन वाघ, अरुण चासकर, प्रशासक सुजाता सचिन चासकर, बाबू गेनू प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाबाजी चासकर, प्रभाकर पडवळ, विकास पडवळ, अजय आवटे, डॉ. रंगनाथ चासकर, डॉ. विठ्ठल चासकर, ग्रामविकास अधिकारी वनवास वासनिक, बाळासाहेब कानडे, दादाभाऊ चासकर, प्रशांत सैद आदी उपस्थित होते.

## मयूर ग्रामीण पतसंस्थेच्या सभासदांना १३ टक्के लाभांश

### सभासदांचा एक लाख रुपयांचा अपघात विमा काढणार : चेअरमन हरिदास रामवत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मंचर । प्रतिनिधी

आंबेगाव तालुक्यातील अवसरी खुर्द येथील मयूर ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेने सभासदांना १३ टक्के लाभांश जाहीर केला असून, हा लाभांश तत्काळ सभासदांच्या खात्यावर जमा करण्यात आला आहे. तसेच संस्थेच्या सर्व सभासदांचा एक लाख रुपयांचा अपघात विमा काढण्यात येणार असल्याची माहिती संस्थेचे चेअरमन हरिदास रामवत यांनी दिली.

मयूर ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेची ३२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा अवसरी खुर्द येथील श्री काळभैरवनाथ मंदिर मंडपात पार पडली. यावेळी रामवत बोलत होते.

संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रावजी बांगर यांनी वार्षिक अहवालाचे वाचन केले. चेअरमन हरिदास रामवत यांनी संस्थेचा आर्थिक लेखाजोखा सभासदांसमोर मांडला. संस्थेचे ९११ सभासद असून, संस्थेकडे ३८ कोटी १९ लाख ४९ हजार रुपयांच्या ठेवी आहेत. संस्थेने सभासदांना २४




कोटी ३ लाख १७ हजार रुपयांचे कर्जवाटप केले आहे. संस्थेचे खेळते भांडवल ४५ कोटी ५२ लाख ३२ हजार रुपये, तर संस्थेचा निधी ३ कोटी ५४ लाख ९२ हजार रुपये आहे. स्थापनेपासून संस्थेला सातत्याने 'अ' वर्ग ऑडिट मिळत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

संस्थेच्या माध्यमातून सभासदांच्या पाल्यांचा गुणगौरव करण्यात येतो. तसेच सभासदांच्या मागणीनुसार दरवर्षी सहलीचे आयोजन केले जाते. सुशिक्षित तरुणांना उद्योग-व्यवसाय उभारण्यासाठी संस्थेमार्फत कर्ज उपलब्ध करून दिले जात असून, कर्जाची वसुलीही चांगल्या पद्धतीने होत असल्याचे रामवत यांनी सांगितले. नियमितपणे कर्जाचे हप्ते भरणाऱ्या सभासदांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

यावेळी संस्थेचे तज्ज्ञ संचालक डॉ. प्रमोद बोत्रे, शरदराव अभंग, पंढरीनाथ तांबे, राजू आढळराव आणि ज्ञानेश्वर शेटे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजी चेअरमन तथा विद्यमान संचालक देवेंद्र जंगम यांनी केले. सूत्रसंचालन ज्योत्स्ना खेडकर व दीपक टेंबेकर यांनी केले, तर कृष्णागर वाघ यांनी आभार मानले.

यावेळी उपाध्यक्ष बाळाराम शिंदे, सुदेश खेडकर, बाळासाहेब वाघमारे, श्रीनिवास होनराव, राजू इनामदार, दीपक टेंबेकर, संचालिका संगीता शिंदे, आशा गायकवाड, कायदेविषयक सल्लागार ॲड. नवनाथ निघोट, ॲड. विलास शेटे आदी उपस्थित होते.

प्रमुख पाहुणे म्हणून पंचायत समिती सदस्य निलेश टेमकर, प्रशासक सरपंच प्रसाद कराळे आणि माजी सरपंच कल्याण शिंदे उपस्थित होते. वार्षिक सर्वसाधारण सभेचे नियोजन मनोज काळदंते, सोमकांत खोल्लम, शैलेश भालेराव व शुभम बैरागी यांनी केले.

## पुणे-नाशिक रेल्वेसाठी चाकणमध्ये सर्वपक्षीय रस्ता रोको

### 'विमानतळ गेला, आता रेल्वे हिरावून घेऊ देणार नाही'; मूळ आराखड्यानुसारच मार्ग करण्याची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

चाकण । प्रतिनिधी

पुणे-नाशिक रेल्वे प्रकल्प जुन्या आणि मूळ आराखड्यानुसारच करण्यात यावा, या प्रमुख मागणीसाठी चाकण चौकात सर्वपक्षीय नेत्यांच्या वतीने तीव्र रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. आमदार बाबाजी काळे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या आंदोलनामुळे चाकण परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.

केंद्र सरकारने स्थानिक लोकप्रतिनिधी आणि नागरिकांना विश्वासात न घेता रेल्वे मार्गात बदल करण्याचा एकतर्फी निर्णय घेतल्याचा आरोप आंदोलकांनी केला. प्रस्तावित मार्गातील बदलामुळे चाकणसह परिसरातील औद्योगिक विकासावर परिणाम होण्याची भीती व्यक्त करण्यात आली.

आमदार बाबाजी काळे म्हणाले, पुणे-नाशिक रेल्वे प्रकल्प हा केवळ वाहतुकीचा मार्ग नाही, तर चाकण आणि परिसरातील औद्योगिक वसाहतींमधील दळणवळण अधिक सक्षम करण्यासाठी तसेच तरुणांच्या रोजगाराच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प आहे. केंद्र सरकारचा मार्ग बदलण्याचा निर्णय अन्यायकारक असून रेल्वे जुन्याच मार्गाने झाली पाहिजे.

यावेळी आंदोलकांनी विमानतळ गेला, आता रेल्वे हिरावून घेऊ देणार नाही! अशी घोषणाबाजी करत प्रशासनाच्या निर्णयाचा निषेध केला. रेल्वेचा मूळ मार्ग कायम ठेवण्याची मागणी करत सर्वपक्षीय नेत्यांनी आंदोलन तीव्र करण्याचा इशारा दिला.

रस्ता रोकोमुळे पुणे-नाशिक महामार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी पोलिसांचा चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

आंदोलनाच्या शेवटी ११ आमदारांच्या स्वाक्षरीचे निवेदन तहसीलदारांना देण्यात आले. पुणे-नाशिक रेल्वेच्या मार्गाबाबत शासनाने स्थानिक नागरिक आणि लोकप्रतिनिधींच्या मागणीचा गांभीर्याने विचार करावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

# वैज्ञानिक दृष्टिकोनयुक्त शाळा' उपक्रमाला शिरूरमध्ये सुरुवात

## महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या ३६व्या वर्धापन दिनानिमित्त लक्षवेधी उपक्रम; चमत्कारांच्या प्रयोगांतून वैज्ञानिक दृष्टिकोनाचे प्रबोधन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

शिरूर : दैनंदिन जीवनात वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अंगीकार व्हावा आणि अंधश्रद्धा, भोंदूगिरी व बुवाबाजीपासून समाजाने विवेकाने दूर राहावे, या उद्देशाने महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या ३६व्या वर्धापन दिनानिमित्त 'वैज्ञानिक दृष्टिकोनयुक्त शाळा' हा उपक्रम सुरू करण्यात आला. शिरूर येथील श्री छत्रपती संभाजी शिक्षण संस्थेच्या विजयमाला विद्या मंदिर इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये आयोजित शिक्षक प्रशिक्षण शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

महाराष्ट्र अंनिसतर्फे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये वर्षभर हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोनाची जाणीव निर्माण करून तो प्रत्यक्ष कृतीत आणण्यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

नाशिक येथे उजेडात आलेल्या अशोक खरात प्रकरणामुळे अस्वस्थ झालेल्या शाळेच्या प्राचार्या मरिया साठे यांनी अंधश्रद्धा निर्मूलनासाठी ठोस उपक्रम राबविण्याचा निर्णय घेतला. त्यांनी महाराष्ट्र अंनिसच्या ॲड. मनीषा महाजन आणि दिगंबर कट्यारे यांच्याशी संपर्क साधला. त्यानंतर १३ जून २०२६ रोजी अंनिसच्या कार्यकर्त्यांनी शाळेला भेट देऊन शिक्षक व पालकांशी संवाद साधला. या वेळी उपक्रमाची सुरुवात शिक्षक प्रशिक्षणापासून करण्याचे ठरले.

त्यानुसार ८ ऑगस्ट रोजी शाळेत शिक्षक प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले. दिगंबर कट्यारे, मुंबईहून आलेले मच्छिंद्रनाथ मुंडे, सुशीला मुंडे आणि उत्तम जोगदंड यांनी प्रशिक्षण दिले. शिबिरात ३२ शिक्षकांनी सहभाग घेतला. सकाळी १०.३० वाजता शिबिराला सुरुवात झाली.

उत्तम जोगदंड यांनी महाराष्ट्र अंनिसची पंचसूत्री, देव-धर्मविषयक भूमिका, संघटनेचे कार्य आणि उपलब्धी यांची माहिती दिली. सुशीला मुंडे यांनी पीपीटीच्या माध्यमातून वैज्ञानिक दृष्टिकोन या विषयावर विस्तृत मार्गदर्शन केले. मच्छिंद्रनाथ मुंडे यांनी विविध 'चमत्कारां'मागील शक्यता आणि वैज्ञानिक दृष्टिकोन समजावून सांगण्यासाठी प्रयोग सादर केल्याने सत्र माहितीपूर्ण तसेच रंजक ठरले.

'मन आणि मनाचे आजार' या सत्रात मच्छिंद्रनाथ मुंडे यांनी मनाशी संबंधित विविध आजार, त्यांची मराठी व इंग्रजी नावे आणि त्यासंबंधीची उदाहरणे समजावून सांगितली. विनोदी आणि ओघवत्या शैलीमुळे शिक्षकांचा या विषयातील सहभाग वाढला. यावेळी शिक्षकांकडून प्रश्नावलीही भरून घेण्यात आली.

दुपारच्या सत्रात विविध 'चमत्कारां'चे प्रयोग प्रत्यक्ष सादर करून त्यामागील विज्ञान आणि हातचलाखीच्या पद्धती समजावून सांगण्यात आल्या. तसेच हे प्रयोग कशा प्रकारे केले जातात, याचे प्रात्यक्षिकही देण्यात आले.

दिगंबर कट्यारे यांनी 'सण, उत्सव आणि पर्यावरण' या विषयावर मार्गदर्शन केले. विविध धर्मांतील सण-उत्सवांमुळे होणारे प्रदूषण कमी करण्यासाठी महाराष्ट्र अंनिसने सुचविलेल्या विधायक पर्यायांची माहिती त्यांनी दिली. तसेच 'वैज्ञानिक दृष्टिकोनयुक्त शाळा' उपक्रमाची अंमलबजावणी कशी करावी, याबाबतही मार्गदर्शन केले. वैज्ञानिक जाणिवा शिक्षण प्रकल्पांतर्गत स्वयंअध्ययन प्रश्नपत्रिकांचे वाटप करण्यात आले.

यावेळी दिगंबर कट्यारे म्हणाले, प्राचार्या मरिया साठे यांनी हा उपक्रम मनावर घेतल्यामुळे त्याला आकार मिळाला. यामुळे इतर शाळांमध्येही हा उपक्रम राबविण्यासाठी संघटनेला बळ मिळाले आहे. हे शिबिर प्रशिक्षणार्थींसोबतच प्रशिक्षकांचाही उत्साह वाढवणारे ठरले.

शिबिराच्या समारोपावेळी प्राचार्या मरिया साठे आणि शिक्षकांनी प्रशिक्षणातून नवीन व उपयुक्त माहिती मिळाल्याचे सांगत शाळेत वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्याचा संकल्प केला. शिक्षकांकडून अभिप्राय फॉर्म भरून घेण्यात आले. प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. सर्व शिक्षकांनी प्रशिक्षणाला सकारात्मक प्रतिसाद दिल्याची माहिती महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे दिगंबर कट्यारे यांनी दिली.

## सारांश वृत्त

### भेसळखोरांनो सावधान! 'तडजोड नाही' · तुकाराम मुंढेंचा एफडीएला कडक इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली: प्रतिनिधी**

खाद्यपदार्थांपासून मद्य आणि मद्यार्क नसलेल्या पेयांपर्यंत भेसळीचे प्रकार वाढत असताना अन्न व औषध प्रशासनाने आता कारवाईचा पवित्रा अधिक आक्रमक करण्याचे संकेत दिले आहेत. नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्यांशी कोणतीही तडजोड खपवून घेतली जाणार नाही, असा स्पष्ट इशारा अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दिला. पुण्यात गावठी दारूमध्ये विषारी रसायन मिसळल्यामुळे मृत्यू झाल्याच्या घटना समोर आल्या आहेत. त्यामुळे केवळ दूध, पनीर आणि खाद्यतेलातील भेसळीपुरती कारवाई मर्यादित न ठेवता मद्य आणि मद्यार्क नसलेल्या पेयांची गुणवत्ता, उत्पादन प्रक्रिया आणि लेबलिंग यांचीही तपासणी करण्यात येणार असल्याचे मुंढे यांनी स्पष्ट केले. 'भविष्यवेध : संवाद भविष्याचा' या उपक्रमांतर्गत आयोजित 'अनस्टॉपेबल तुकाराम' या विशेष मुलाखतीत ते बोलत होते. त्यांच्या या भूमिकेमुळे अन्न आणि पेय उद्योगातील नियमांचे उल्लंघन करणाऱ्या उत्पादकांवर आता प्रशासनाची नजर अधिक कठोर होणार असल्याचे संकेत मिळाले आहेत. मुंढे यांनी केवळ भेसळीवरच भाष्य केले नाही, तर बदलत्या आहारपद्धतीवरही चिंता व्यक्त केली. चरबीयुक्त, अतिखारट आणि अतिसाखरयुक्त पदार्थांच्या वाढत्या सेवनामुळे उच्च रक्तदाब, मधुमेह आणि लठ्ठपणासारख्या आजारांचे प्रमाण वाढत असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे कायद्याने निश्चित केलेल्या मानकांनुसारच खाद्यपदार्थ नागरिकांपर्यंत पोहोचले पाहिजेत, अशी भूमिका त्यांनी मांडली. मात्र प्रश्न केवळ प्रशासनाच्या कारवाईचा नाही. अन्न उद्योग नियम पाळणार का, प्रशासन सातत्याने तपासणी करणार का आणि ग्राहक स्वतः किती जागरूक राहणार? या तीन पातळ्यांवरच अन्नसुरक्षेची खरी परीक्षा होणार आहे. मुंढे यांनी याच कार्यक्रमात नेतृत्व आणि जबाबदारीवरही भाष्य केले. यशाचे श्रेय स्वतःकडे आणि अपयशाची जबाबदारी दुसऱ्यावर ढकलणे म्हणजे नेतृत्व नव्हे, असे सांगत त्यांनी अधिकाऱ्यांना आणि तरुणांना जबाबदारी स्वीकारण्याचा संदेश दिला.

# रिलायन्सवर अंमलबजावणी संचालनालयाचा आणखी एक घाव! बनावट कंपन्या, खोटी देयके अन् हिऱ्यांच्या वाढीव किमतींचा कथित खेळ?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

रिलायन्स अनिल अंबानी समूहाभोवती आर्थिक गैरव्यवहाराच्या आरोपांचं वादळ आणखी गडद होताना दिसत आहे. अंमलबजावणी संचालनालयाने अर्थात ईडीने रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड आणि इतरांविरोधात कथित काळा पैसा पांढरा करण्याच्या प्रकरणात न्यायालयीन खटला सुरू करण्यासाठी तक्रार दाखल केली आहे. ८ ऑगस्ट रोजी दाखल करण्यात आलेल्या या तक्रारीत रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चरसह अनिल अंबानी समूहाचे माजी वरिष्ठ अधिकारी सतीश सेठ आणि इतरांची नावं आहेत.

ईडीची ही कारवाई मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने दाखल केलेल्या प्रथम माहिती अहवालावर आधारित आहे. या अहवालात गंभीर आर्थिक गैरव्यवहाराचे आरोप करण्यात आले आहेत. तपास यंत्रणेच्या आरोपानुसार, बनावट कंपन्यांच्या माध्यमातून पैसा फिरवण्यात आला, अस्तित्वात नसलेल्या व्यवहारांसाठी खोटी देयके तयार करण्यात आली आणि हिऱ्यांच्या आयातीची किंमत प्रत्यक्ष मूल्यापेक्षा जास्त दाखवण्यात आली.

म्हणजेच प्रश्न केवळ पैशांच्या व्यवहाराचा नाही. कागदोपत्री व्यवहारांच्या आडून पैसा कुठून आला, कुठे गेला आणि त्याचा अंतिम लाभार्थी कोण होता, हा या संपूर्ण प्रकरणातील सर्वात महत्त्वाचा प्रश्न आहे. याच वेळी




ईडीने रिलायन्स कम्युनिकेशन्सशी संबंधित कथित निधी वळवण्याच्या प्रकरणात अतिरिक्त न्यायालयीन तक्रारही दाखल केली आहे. त्यामुळे अनिल अंबानी समूहाशी संबंधित आर्थिक प्रकरणांची व्याप्ती आणखी वाढताना दिसत आहे.

मात्र एक महत्त्वाची बाब लक्षात घ्यावी लागेल ईडीचे आरोप म्हणजे न्यायालयीन दोषसिद्धी नव्हे. हे आरोप न्यायालयात सिद्ध होणे बाकी आहे आणि संबंधित आरोपींना आपला कायदेशीर बचाव करण्याचा पूर्ण अधिकार आहे.

तरीही या प्रकरणामुळे एक मोठा प्रश्न पुन्हा समोर येतो मोठ्या उद्योगसमूहांमध्ये हजारो कोटींचे व्यवहार होत असताना अंतर्गत नियंत्रण व्यवस्था, लेखापरीक्षण यंत्रणा आणि सरकारी देखरेख नेमकी कुठे होती? आता ईडीच्या तपासातून या कथित पैशांच्या प्रवाहाचा मागोवा कुठपर्यंत जातो आणि या संपूर्ण व्यवहारामागे नेमके कोण होते, हे स्पष्ट होणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## श्रीलंकेच्या मदतीला भारत पुन्हा धावला! चक्रीवादळाने उद्ध्वस्त केलेले रस्ते जोडण्यासाठी ५ पूल सुपूर्द

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे : प्रतिनिधी**

श्रीलंकेत चक्रीवादळामुळे उद्ध्वस्त झालेल्या ग्रामीण भागातील रस्त्यांच्या पुनर्बांधणीसाठी भारताने पुन्हा एकदा मदतीचा हात पुढे केला आहे. भारताने श्रीलंकेला बेली पूलांची तिसरी खेप सुपूर्द केली असून, या खेपेत पाच अद्ययावत बेली पूलांचा समावेश आहे. या पुलांची किंमत ५० लाख अमेरिकी डॉलरपेक्षा अधिक असल्याचे श्रीलंकेच्या परिवहन मंत्रालयाने सांगितले आहे.

भारताच्या श्रीलंकेतील उच्चायुक्तालयाने दिलेल्या माहितीनुसार, ८ ऑगस्ट २०२६ रोजी २५० मेट्रिक टनांपेक्षा जास्त वजनाची ही सामग्री श्रीलंकेकडे सुपूर्द करण्यात आली. चक्रीवादळ डिटवाहमुळे ग्रामीण भागातील अनेक रस्ते आणि वाहतूक मार्गांचे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे पूल उभारणीच्या माध्यमातून संपर्क व्यवस्था पूर्ववत करण्याला प्राधान्य दिले जात आहे.

ही भारताकडून श्रीलंकेला देण्यात आलेली बेली पुलांची तिसरी मदत आहे. यापूर्वीही भारताने दोन खेपांमध्ये अशाच प्रकारचे पूल श्रीलंकेला उपलब्ध करून दिले होते. त्यामुळे ही मदत केवळ तात्पुरती मदत न राहता आपत्तीग्रस्त भागातील वाहतूक आणि दळणवळण व्यवस्था पुन्हा उभी करण्याच्या व्यापक प्रयत्नांचा भाग ठरत आहे.

विशेष म्हणजे, ही मदत भारताच्या ४५ कोटी अमेरिकी डॉलरच्या आपत्तीनंतरच्या पुनर्बांधणी पॅकेजचा भाग आहे. या माध्यमातून श्रीलंकेतील चक्रीवादळग्रस्त भागांमध्ये पायाभूत सुविधा पुन्हा उभारण्यास मदत केली जात आहे.

## या गुन्ह्याचं उत्तर द्यावंच लागेल! · विद्यार्थ्यांवरील पोलिसी कारवाईवर राहुल गांधींचा अमित शहांना थेट सवाल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

प्रयागराजमध्ये विद्यार्थ्यांच्या आंदोलनावर कथित पोलिसी अत्याचाराचा मुद्दा आता थेट केंद्र सरकारच्या गृहमंत्र्यांपर्यंत पोहोचला आहे. काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी ९ ऑगस्ट २०२६ रोजी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या मौनावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत, या गुन्ह्याचं उत्तर तुम्हाला द्यावंच लागेल, असा थेट इशारा दिला.

याच्या आदल्या दिवशी म्हणजेच ८ ऑगस्ट रोजी प्रयागराजमध्ये आयोजित 'छात्रों की गूंज' कार्यक्रमात राहुल गांधी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. या कार्यक्रमात एका विद्यार्थ्याने आपल्याकडे आता कोणताही पर्याय उरलेला नाही, अशी भावना व्यक्त केल्याचे राहुल गांधी यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांच्या आंदोलनादरम्यान पोलिसांकडून कथितपणे करण्यात आलेली मारहाण आणि कठोर कारवाई यावरून राहुल गांधी यांनी केंद्र सरकारला लक्ष्य केले. विशेषतः देशाच्या अंतर्गत सुरक्षेची जबाबदारी असलेल्या गृहमंत्र्यांनी या प्रकरणावर मौन का बाळगले आहे, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

राहुल गांधींच्या या वक्तव्यामुळे राजकीय संघर्ष आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे. कारण मुद्दा केवळ विद्यार्थ्यांच्या आंदोलनापुरता मर्यादित राहिलेला नाही; आंदोलन करणाऱ्या तरुणांशी राज्य यंत्रणा नेमकी कशी वागते आणि पोलिसी कारवाईला राजकीय जबाबदारीची चौकट आहे की नाही, हा व्यापक प्रश्न आता उपस्थित झाला आहे.

मात्र पोलिसांवरील आरोपांची स्वतंत्र आणि निष्पक्ष चौकशी होणेही तितकेच महत्त्वाचे आहे. आरोप सिद्ध होण्यापूर्वी कोणालाही दोषी ठरवता येत नाही. पण राहुल गांधींचा राजकीय संदेश स्पष्ट आहे८ ऑगस्टला विद्यार्थ्यांचा आवाज ऐकवला गेला आणि ९ ऑगस्टला त्या आवाजाची जबाबदारी थेट गृहमंत्र्यांकडे सोपवण्यात आली.

आता अमित शाह या आरोपांवर मौन बाळगतात की विद्यार्थ्यांवरील कथित पोलिसी कारवाईबाबत सरकारची भूमिका स्पष्ट करतात, याकडे देशाचं लक्ष लागलं आहे.

## निकोबार प्रकल्पावरून पुन्हा सरकारला घेरलं! जयराम रमेशांचा एनजीटीला सवालमान्यता देणारा अहवाल जनतेपासून का लपवला?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

९ ऑगस्ट २०२६ रोजी काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी ग्रेट निकोबार बेटावरील महत्त्वाकांक्षी प्रकल्पावरून राष्ट्रीय हरित लवाद अर्थात एनजीटीला थेट सवाल केला. पर्यावरणाच्या दृष्टीने अत्यंत धोकादायक असल्याचा आरोप होत असलेल्या या प्रकल्पाला दिलेल्या पर्यावरणीय मंजुरींचा आढावा घेण्यासाठी एनजीटीच्या निर्देशानुसार स्थापन करण्यात आलेल्या उच्चाधिकार समितीचा अहवाल सार्वजनिक करावा, अशी मागणी रमेश यांनी केली.

रमेश यांच्या म्हणण्यानुसार, या समितीच्या अहवालाच्या आधारेच एनजीटीला या प्रकल्पाला पुढे जाण्याची परवानगी देण्याची वेळ आली. मात्र हा अहवाल अद्याप सार्वजनिक करण्यात आलेला नाही. त्यामुळे नेमका कोणता अभ्यास झाला, कोणते पर्यावरणीय धोके लक्षात घेण्यात आले आणि प्रकल्पाला मंजुरी देताना कोणत्या निकषांचा आधार घेण्यात आला, हे प्रश्न अनुत्तरित आहेत.

रमेश यांनी दावा केला की हा अहवाल सार्वजनिक झाल्यास त्यातील त्रुटी उघड होतील. मोदी सरकारने तर्कसंगत टीका आणि पूर्वीच्या न्यायालयीन निर्णयांकडे दुर्लक्ष केल्यामुळे पर्यावरणाच्या दृष्टीने आधीच मोठे नुकसान झाले असल्याचा आरोपही त्यांनी केला.

ग्रेट निकोबार प्रकल्प हा केवळ विकासाचा विषय नाही. द्वीपसमूहातील जंगल, जैवविविधता, स्थानिक समुदाय आणि पर्यावरणीय समतोल यांच्यावर त्याचा काय परिणाम होणार, हा मूलभूत प्रश्न आहे.

म्हणूनच जयराम रमेश यांनी विविध न्यायाधिकरणांनी, विशेषतः एनजीटीने, आपला आवाज आणि अधिकार पुन्हा प्रभावीपणे वापरावा आणि कायद्याने दिलेली जबाबदारी पूर्णपणे पार पाडावी, अशी अपेक्षा व्यक्त केली.

आता प्रश्न सरळ आहेजर समितीचा अहवाल सरकार आणि प्रकल्पाच्या बाजूने इतका स्पष्ट असेल, तर तो सार्वजनिक करण्यास संकोच का?

पर्यावरणीय मंजुरी पारदर्शक असेल, तर अहवाल जनतेसमोर ठेवण्यात अडचण कोणती? आणि जर अहवालात गंभीर त्रुटी असतील, तर त्याच्या आधारे दिलेल्या मंजुरीची जबाबदारी कोण घेणार?

निकोबारच्या विकासाचा प्रश्न आता केवळ प्रकल्पाचा राहिलेला नाही; तो पारदर्शकता, पर्यावरण आणि संस्थात्मक स्वायत्ततेच्या विश्वासार्हतेची कसोटी बनला आहे.

## हवेत 300 फूटांची अचानक घसरण! एअर इंडियाच्या वैमानिकाची मादक द्रव्यांसाठी पुन्हा तपासणी; गंभीर घटनेचा तपास सुरू

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

एअर इंडियाच्या विमानाने हवेत अचानक सुमारे ३०० फूट उंची गमावल्याने विमान सुरक्षेचा गंभीर प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. ४ ऑगस्ट २०२६ रोजी फुकेतहून दिल्लीला येणाऱ्या एअर इंडियाच्या एआय२३७९ या विमानासोबत ही घटना घडली. एअरबस ए३२० हे विमान प्रवासादरम्यान अचानक खाली घसरले; त्यानंतर विमान स्थिर करण्यात आले आणि दिल्ली विमानतळावर सुरक्षितपणे उतरवण्यात आले.

मात्र या घटनेनंतर वैमानिकांच्या आरोग्य आणि सुरक्षिततेशी संबंधित आणखी एक गंभीर बाब समोर आली आहे. विमानाच्या प्रमुख वैमानिकाची मानसिक परिणाम करणाऱ्या पदार्थांसाठी प्राथमिक तपासणी करण्यात आली होती. या तपासणीच्या निकालात पुढील विश्लेषणाची गरज असल्याचे आढळल्यानंतर त्याची पुष्टी करणारी पुन्हा तपासणी करण्यात आली आहे, अशी माहिती नागरी विमान वाहतूक मंत्रालयाने ९ ऑगस्ट रोजी दिली.

ही बाब अत्यंत संवेदनशील आहे. कारण वैमानिकाच्या शरीरात मानसिक किंवा चेतासंस्थेवर परिणाम करणारा कोणताही पदार्थ आढळतो का, याचा थेट संबंध विमानातील शेकडो प्रवाशांच्या सुरक्षिततेशी जोडला जातो. मात्र प्राथमिक तपासणीचा निकाल म्हणजे वैमानिकाने कोणताही प्रतिबंधित पदार्थ घेतला होता, असा निष्कर्ष काढणे घाईचे ठरेल. पुष्टीकरण चाचणीचा अंतिम निकाल आणि अधिकृत तपास पूर्ण होणे आवश्यक आहे.






दरम्यान, या घटनेला 'गंभीर घटना' म्हणून वर्गीकृत करण्यात आले असून विमान अपघात तपास ब्युरो अर्थात एएआयबीकडून चौकशी सुरू आहे.

या तपासात विमानाची उंची अचानक का कमी झाली, वैमानिकांच्या निर्णयक्षमतेवर काही परिणाम झाला होता का, तांत्रिक बिघाड होता का किंवा हवामानाशी संबंधित कारण होते का, याची सखोल तपासणी होणार आहे.

प्रश्न मात्र गंभीर आहेप्रवाशांना काहीही धोका निर्माण होण्यापूर्वी विमान कंपन्यांची वैमानिकांच्या आरोग्य आणि मादक द्रव्य तपासणी व्यवस्था किती सक्षम आहे?

विमान सुरक्षित उतरलं, ही दिलासादायक बाब आहे. पण ३०० फूटांची अचानक घसरण आणि त्यानंतर समोर आलेली वैमानिकाच्या तपासणीची बाबया दोन्हींचा पूर्ण आणि पारदर्शक तपास होणं अत्यावश्यक आहे.

## १.५ कोटी मतदारांची नावं यादीतून गायब! 'शुद्धीकरण' की मतदानाच्या अधिकारावर मोठा प्रश्न? SIR 3.0 वर संशयाची सावली

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई : प्रतिनिधी**

देशातील मतदारयाद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षणाच्या तिसऱ्या टप्प्याने आता गंभीर राजकीय आणि लोकशाही प्रश्न उभे केले आहेत.

८ ऑगस्ट २०२६ पर्यंत तिसऱ्या टप्प्यातील विशेष सखोल पुनरिक्षणात दीड कोटींपेक्षा अधिक नावे प्रारूप मतदारयाद्यांमधून वगळण्यात आली आहेत. मात्र हा आकडा समजून घेताना एक महत्त्वाची बाब लक्षात घेणे आवश्यक आहेही सर्व नावे अंतिमतः कायमची मतदारयादीबाहेर गेली आहेत, असा अर्थ काढता येणार नाही.

निवडणूक आयोगाच्या म्हणण्यानुसार, या प्रक्रियेचा उद्देश मृत व्यक्तींची नावे, स्थलांतरित मतदार, दुबार नोंदी आणि पात्र नसलेल्या नोंदी शोधून मतदारयाद्या अद्ययावत करणे हा आहे. तिसऱ्या टप्प्यात १६ राज्ये आणि ३ केंद्रशासित प्रदेशांमधील सुमारे ३६.७३ कोटी मतदारांची घराघरांत जाऊन पडताळणी करण्यासाठी ३.९४ लाखांहून अधिक मतदान केंद्रस्तरीय अधिकारी तैनात



करण्यात आले आहेत.

पण खरी चिंता इथेच सुरू होते.

आंध्र प्रदेश आणि हरियाणासारख्या राज्यांमध्ये लाखो नावे प्रारूप यादीतून वगळली गेली आहेत. १ ऑगस्टपर्यंत दहा राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या प्रारूप याद्यांमध्येच १.१२ कोटींपेक्षा अधिक नावे वगळल्याचे वृत्त होते. आता आणखी राज्यांच्या प्रारूप याद्या प्रसिद्ध झाल्याने हा आकडा दीड कोटींच्या पुढे गेला आहे.

ईसीआय सांगते की नागरिकांना दावे आणि हरकती दाखल करण्याची संधी आहे. आयोगाच्या म्हणण्यानुसार, पडताळणी, नमुना तपासणी आणि सार्वजनिक हरकतींच्या प्रक्रियेनंतर पात्र मतदारांची नावे पुन्हा समाविष्ट केली जाऊ शकतात.

म्हणून प्रश्न फक्त किती नावे कापली? हा नाही.

खरा प्रश्न आहेयातील किती नावे मृत व्यक्तींची आहेत? किती जण प्रत्यक्षात स्थलांतरित झाले आहेत? किती दुबार नोंदी आहेत आणि किती जिवंत, पात्र मतदारांची नावे कागदपत्रांच्या किंवा पडताळणीच्या त्रुटींमुळे वगळली गेली?

कारण मतदारयादीतील एक चुकीची नोंद म्हणजे केवळ प्रशासकीय चूक नाही; ती नागरिकाच्या मतदानाच्या मूलभूत अधिकारावर परिणाम करू शकते.

म्हणून डखठ ३.० मध्ये पारदर्शकता सर्वात महत्त्वाची आहे. प्रत्येक वगळलेल्या नावामागचं कारण सार्वजनिक असलं पाहिजे, नागरिकांना सहज हरकत नोंदवता आली पाहिजे आणि अंतिम यादीपूर्वी प्रत्येक पात्र मतदाराला आपलं नाव सुरक्षित आहे याची खात्री मिळाली पाहिजे.

मतदारयादी स्वच्छ असायलाच हवी; पण ती स्वच्छ करताना मतदारच पुसला जाणार नाही, याची जबाबदारी कोण घेणार?